ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

## CONTENTS


| Sr. No. | Name & Author | Pages |
|---|---|---|
| ३ | बी .रघुनाथांचे साहित्य आणि आडगावचे चौधरी मधील ऐतिहासिक ग्रामीण बोली वास्तव<br>**डॉ. विठ्ठल जंबाले** | १०-१३ |
| ४ | हिंगोली जिल्हयातील ग्रामीण वस्तींच्या प्रकाराचे भौगोलिक विश्लेषण<br>**डॉ. गोने सदानंद हरिबा**<br>**प्रा. फड नागनाथ माधवराव** | १४-१७ |
| ५ | महाराष्ट्रातील मुस्लिम खाटीक समाजाच्या विकासासाठी राज्य शासनातर्फे संशोधनाची गरज<br>**डॉ. देवेंद्र जोशी (हिंगोलीकर)**<br>**सय्यद एजाज अली अमजद अली** | १८-२१ |
| ६ | कोरडे नक्षत्र चे जाणीव विश्व : एक अभ्यास<br>**प्रा. कांबळे दत्ता रामचंद्र** | २२-२३ |
| ७ | हैद्राबाद स्टेट काँग्रेस आणि श्री. काशीनाथराव जाधव<br>**श्रीमती एस. एन. जाधवर** | २४-२७ |
| ८ | शिवछत्रपतींचा समाजक्रांतीचा एक महान प्रयत्न<br>**मलसटवाड संतोष बबनराव** | २८-३० |
| ९ | महाराष्ट्रातील कोकणा-कोकणी आदिवासींचा इतिहास<br>**मालती सिताराम जगताप** | ३१-३४ |
| १० | स्त्री - पुरुष समानता व मराठी वृत्तपत्रातील वार्ताकन<br>**सुमंगला सुंदरराव शिंदे** | ३५-३६ |
| ११ | चक्रवर्ती सम्राट अषोक आणि रक्तविरहीत धम्मकांती<br>**प्रा. प्रकाश तुकाराम शिंदे** | ३७-४२ |
| १२ | पुराणमध्ये वीरशैव साहित्य<br>**डॉ. सौ. अपर्णा प्र. जिरवणकर** | ४३-४६ |
| १ | भक्ती आंदोलन में महाराष्ट्र का योगदान<br>**डॉ. साळोक लक्ष्मण हिलालसिंग** | १-४ |


Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

'**जिनिअस**' या सहामयि प्रसिध्द झालेली मते मुख्य संपादक, संपादक मंडळ व सल्लागार मंडळास मान्य असतीलच असे नाही. या नियतकालिकात प्रसिध्द करण्यात आलेली लेखकाची मते ही त्याची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोधनिबंधाची जबाबदारी स्वत: लेखकावर राहील.

हे नियतकालिक मालक, मुद्रक, प्रकाशक विनय शंकरराव हातोले यांनी अजिंठा कॉम्प्युटर ॲण्ड प्रिंटर्स [illegible] औरंगाबाद येथे [illegible]

# बी .रघुनाथांचे साहित्य आणि आडगावचे चौधरी मधील ऐतिहासिक ग्रामीण बोली वास्तव

डॉ. विठ्ठल जंबाले
पदवी व पद्व्युत्तर मराठी विभागप्रमुख, देगलूर महाविद्यालय, देगलूर.

**प्रस्तावना**

मराठवाडा हा वैविध्यपूर्ण प्राकृतिक वैशिष्ट्यांनी नटलेला विशाल प्रदेश आहे. मराठी वाङ्मयात मराठवाड्यातील लेखकांचे योगदान मोलाचे आहे. ग्रामीण लेखकांकडून कथा, कादंबरी, कविता व इतर वाङ्मय प्रकारांतून बोलीभाषेचा वापर करण्यात येत आहे. अलीकडे बोलीचा साहित्यभाषा म्हणून संचार होत आहे. मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरी त्याला अपवाद नाही. लेखकाचा स्तर, सामाजिक दर्जा आणि अनुभवक्षेत्र यातून आकलन झालेल्या बोलीचा उपयोग साहित्यामध्ये होत आहे. साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहांनी कादंबरीमध्ये बोलीच्या उपयोजनास प्रतिष्ठा मिळवून दिली. भौगोलिकदृष्ट्या मराठवाडा विविधतेने नटलेला प्रदेश आहे. मराठवाड्याचे क्षेत्र इतर प्रदेशाशी जोडलेले आहे. याचा प्रभाव मराठवाडी बोलीवर जाणवणे साहजिक आहे. मराठवाडा क्षेत्रातील बोलीवर भाषिकदृष्टया त्या त्या प्रदेशातील सीमावर्ती शेजारभाषा किंवा शेजारी बोलींचा प्रभाव झालेला आहेच. त्यातून परिसरनिष्ठ बोलीभाषा घडलेली आहे. तसेच मराठवाडयात 'जाती बोली' अस्तित्वात आहेत. वय, समाजगट, व्यवसाय, सामाजिक-दर्जा, लिंग, शेजारी भाषा व संपर्क भाषा यातून बोली विशिष्टता प्रत्ययास येतेच. मराठवाडी बोलीवर भाषिक आक्रमणे झालेली आहेत. त्या आक्रमणातून संक्रमित झालेली मराठवाडी बोली संकरित रुपात अलीकडील साहित्यातून प्रतिबिंबित झालेली आहे.साहित्य हे मानवी जीवनाचा आरसा असते. साहित्यकृती लेखकाच्या जीवनानुभूतीचा आविष्कार असते. याच प्रवृत्तीतून मराठवाडयातील लेखकांनी साहित्यविश्व निर्माण केले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात मराठवाडयातील साहित्यातून गावगाडयाचे चित्रण आले आहे. मराठी साहित्यामध्ये साठोत्तरी कालखंड महत्त्वाचा आहे. यासुमारास ग्रामीण दलित, स्त्रीवादी, आदिवासी साहित्यप्रवाहांचा उगम झाला. विविध वाङ्मय प्रकारामध्ये साहित्य निर्मिती मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. रा. रं. बोराडे, नागनाथ कोतापल्ले, शेषराव मोहिते, भीमराव वाघचौरे, बाबू बिरादार, भारत काळे याकादंबरीकारांनी साहित्यक्षितिजावर मराठवाडा प्रदेश साकारला. ग्रामीण कादंबरीमध्ये बोलीभाषेचा जाणीवपूर्वक वापर करण्यात येत आहे. विशेषतः मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीतून योजलेली बोलीभाषा व्यक्ती, समाज, जात, वर्ण, धर्म, व्यवसाय, सामाजिक दर्जा, प्रदेश, परिसर, संस्कृती, वय आणि लिंग या घटकांशी निगडित वैविध्यपूर्णता दर्शविते. 'आडगांवचे चौधरी' पासून ते आजपर्यंत अनेक साहित्यकृती बोलीदृष्ट्या दखलपात्र आहेत. कादंबरीमध्ये दोन अंगांनी बोली वापरली जाते, (i) निवेदन आणि (ii) संवाद. म्हणजेच संभाषण आणि कथन हे कथात्म साहित्याचे अभिन्न अंग असतात. कादंबरी हा कथात्म वाङ्मयप्रकार आहे. कथात्म साहित्यामध्ये निवेदन अनन्यसाधारण महत्त्वाचे आहे. कादंबरीमध्ये बोलीभाषेची योजना केल्यामुळे कथनास सजीवत्व प्राप्त होते. तिच्यात विचारांची अथवा कथाभागाची कथनाशी एकरुपता येण्यासाठी बोलीचे उपयोजन परिणाकारक ठरते.

**अल्प-परिचय**

परभणी येथे निजाम शासनाच्या कचेरीत कारकुनाची नोकरी करणारे बी. रघुनाथ (भगवान रघुनाथराव कुलकर्णी ) हे मराठवाडयातील पहिले ग्रामीण कादंबरीकार आहेत. त्यांचा जन्म २५ ऑगस्ट, १९१३ व मृत्यू -७ सप्टें.१९५३ झाला. तसेच त्यांचे शिक्षण मॅट्रीकपर्यंत झाले. मूळचे परभणी जिल्ह्यातील सातोना यागावचे .१९३२ पासून हयातभर सरकारी बांधकाम खात्यात कनिष्ठ कारकुनाची नौकरी करीत असताना साहित्याची जोपासना केली. मराठवाड्यातील ग्रामीण वास्तव साहित्यातून चित्रित करणारे हे आद्य लेखक आहेत. त्यांचे 'आलाप-विलाप' (१९४१) व 'पुन्हा नभाच्या लाल कडा' (१९५५) हे काव्यसंग्रह; 'साकी' (१९४०), 'फकीराची कांबळी', 'छागल', 'आकाश' आणि 'काळी राधा' (१९५६) हे कथासंग्रह; व 'ओऽऽ' (१९३६) 'हिरवे गुलाब' (१९४३), 'बाबू दडके' (१९४४), 'उत्पात' (१९४५), 'म्हणे लढाई संपली'(१९४६) आणि 'आडगावचे चौधरी' (१९५६) अशा सात कादंबऱ्या इत्यादी वाङ्मयीनप्रकारामध्ये महत्वाचे योगदान राहिले आहे. 'हिरवे गुलाब' ही एक समर्थ प्रादेशिक कादंबरी वाटते. तिच्यात यात्रा-ऊरूस, रुढी

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

देव-देवळ, पीक-शेत, यांच्या वर्णनावरुन निसर्गासह खास प्रदेशाच्या जनजीवनाची कल्पना येते. तसेच 'उत्पात' या कादंबरीत प्रादेशिक जीवनदर्शनाचे वैशिष्टये आहेच. "आडगावचे चौधरी" ही त्यांच्या मृत्यूनंतर प्रकाशित झालेली अस्सल ग्रामीण कादंबरी आहे.

साहित्यामध्ये दुर्लक्षित राहिलेला मराठवाडा प्रदेश याकादंबरीत रेखाटला आहे. येथील ग्रामजीवन, समाज-संस्कृती, वतनदारी-सरंजामीवृत्ती, निजामी राजवटीने प्रभावित गाव आणि गाववाडा यांचे वास्तवदर्शन याकादंबरीत घडते. आडगावच्या चौधऱ्यांच्या नऊ पिढयांचा संदर्भ देऊन सात ांच्या अन्याय अत्याचाराची कहाणी लेखकांनी वर्णन केली आहे. चौधरी (वतनदार) हे शासन व्यवस्थेचे शिलेदार असून कृषक समाज आणि नव्यवस्था यांची फसवणूक करतात. जनतेचे शोषण करणे हा चौधऱ्यांचा हक्क असतो. नात्यातील आसपासच्या सरंजामदारांची फसगत करणे ही ी वृत्तीच बनलेली असते. यासमस्या प्रस्तुत कादंबरीमध्ये मांडलेल्या आहेत. वतनदार शासकीय यंत्रणा व सामान्य जनतेचा उपभोगवस्तू म्हणून वापर तात. हा चौधऱ्यांचा रिकामा डामडौल अथवा गतकालीन ग्रामीण समाजवास्तव प्रस्तुत कादंबरी वाचकांसमोर उभी करते. त्याला मराठवाड्यातील णिवांची स्पर्श झाल्यासारखे वाटते. बी. रघुनाथांच्या कसदार व संस्कृतप्रचूर भाषेचा डौल अनुभवास येतो. बोलीतील रुढ वाक्प्रचार वा उर्दू शब्दांचा खल वापर आणि सुभाषित वजा वाक्यांची योजना केल्यामुळे याकादंबरीतील भाषेला सूचकतेने अधिक अर्थवाहकता आलेली दिसते.

प्रारंभीच्या काळातील 'आडगांवचे चौधरी' (१९५६) ही बी. रघुनाथ यांची मराठवाड्यातील पहिलीच प्रादेशिक कादंबरी. बी.रघुनाथांच्या ायुष्यातील शेवटची कादंबरी. निजाम राजवटीत मराठवाड्यामध्ये ग्रामीण भागात जे वतनदार सरंजामदारांचे प्रस्थ वाढलेले होते. ते परंपरागत ामरचनेचा कणा समजण्यात येत असे. 'आडगांवचे चौधरी' खेड्यातील वतनदारांचे प्रतिनिधी आहेत. त्यांच्या नऊ पिढ्यांच्या संदर्भातून आणि ात पिढ्यांच्या अन्याय-अत्याचाराची कहाणी येथे कथन केली आहे. तीनशे वर्षांचा कालखंड चित्रित करताना या कादंबरीत तत्कालीन सामाजिक वास्तवाचे उत्तम दर्शन घडते.

प्रस्तुत कादंबरी निवेदनप्रधान आहे निवेदनाकरिता तृतीय पुरुषी कथनपध्दती स्वीकारलेली आहे. या कादंबरीचा बहुतांश पट निवेदनातून साकारला आहे. यामधील निवेदन घटना-प्रसंगाचे हुबेहुब दर्शन घडविते. याकरिता कसदार भाषायोजना केलेली दिसते. संस्कृतप्रचूर भाषा, बोलीतील रुढ वाक्प्रचार व ऊर्दू शब्दांचा चपखल वापरामुळे प्रसंग व वातावरण यास अनुरुप असे रुपही धारण करते. कथनाकरिता योजलेली भाषा बी.रघुनाथाच्या समकालीन समाज वास्तवात आढळणारी भाषा आणि साहित्य लेखनाची भाषा यांचे संमिश्र रुप दिसते. म्हणूनच निवेदनातून प्रत्ययास येणाऱ्या बोली वैशिष्ट्यांचा परामर्श घेणे प्रस्तुत आहे.प्रस्तुत कादंबरी ग्रामीण बोलीच्या दृष्टीने तेवढी लक्षणीय नाही. परंतु सुरुवातीच्या कादंबरी लेखनात ग्रामीणतेचा प्रत्यय देणारी कादंबरी म्हणून विचार करणे प्रस्तुत आहे. खेड्यातील बोलीमधील प्रतिमा, म्हणी, वाक्प्रचार व ग्रामीण शब्दकळा यांचा अभ्यास करणे येथे क्रमप्राप्त ठरते.

**म्हणी - सुभाषिते**

मराठवाड्यातील ग्रामीण बोलीमध्ये कथन प्रभावी होण्यासाठी सुभाषितांचा वापर केला जातो. गहन व गूढार्थ मोजक्या शब्दातून मार्मिकतेने सांगण्याची क्षमता म्हणी-सुभाषितांमध्ये असते. खेड्यातील सुभाषितांचे संदर्भ प्रस्तुत निवेदनामध्ये आढळतात. उदा.लाख गमावले पण जान बचावले, उपेक्षेत खचले आणि अंधारात रुतले, ज्या घरी अन्न खावं, तिथं चोरी करु नये, आडगावची माती कसाची होती , चौधऱ्यांची दक्षिणा न ठरो, शौर्यांचा आदर्श म्हणजे आडगांवचे चौधरी, क्रौर्यांची परिसीमा म्हणजे आडगांवचे चौधरी अशी चौधऱ्यांच्या नाव-गावांचा उल्लेख असलेली काही वाक्ये सुभाषितरुप धारण केलेली दिसतात. त्या वाक्यांना गर्भित अर्थ असून प्रतिकात्मक अर्थाने वापरले जातात. विशेषतः ही परिसरनिष्ठ आशयबांधक वचनेच असतात.

**वाक्प्रचार**

ग्रामीण भागातील व्यवहारात वाक्प्रचारांचा वापर लक्षणीय ठरतो. त्यामुळे संवादात अथवा कथनात सूचकता दर्शविण्यात येते. असे शब्द-शब्दबंध अथवा वाक्संप्रदाय येथे आढळतात. अंगाला राख लावून निघून जाणे, गावकऱ्यांचे गळे दाबणे, पायाला भिंगरी लागणे, आंबट चेहरा करणे, हात मारणे (डल्ला) वगैरे मानवी शरीरांशी संबधित वाक्प्रचार भाषिक लकबीचे वैभव वाटतात. जातक वर्तविणे, मुशीत ओढून काढणे, घर नांगरुण काढणे, पैरवी करणे, बतावणी / सोंग घेणे, कचाट्यातून सुटणे, गवऱ्या मस्नात जाणे वगैरे. परिसराशी संबंधित अथवा बोलीभाषेशी जवळीकता दर्शविणारे वाक्प्रचार या कादंबरीत विशेष लक्षणीय ठरले आहेत.

ADAT VYAPARI ... SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded

**अभ्यस्त शब्द**

I) बोलीमध्ये एकाच अर्थाचे शब्द समोरासमोर वापरण्याची पध्दती आहे. प्रस्तुत कादंबरीत याचा प्रत्यय येतो. उदा. सोयीर-सगाई, सरकत-फरकत, छंद-फंद, मारहाण, आया-बहिणी, बाजारहाट .

II) पहिल्यापदी येणाऱ्या अर्थपूर्ण शब्दाला जोडून दुसरा एक निरर्थक शब्द उच्चारण्याची प्रवृत्ती मराठवाडी बोलीत आहे. असे शब्द या कथनात वापरलेले दिसतात.उदा . अंगारंगात, खूसपूस, सलवित-भूलवित, हिरमसून-मूरमसून, आळोखे-पिळोखे, आंबड-झिंबड, जामानिमा, शिळयापाक्या, चोळा-मोळा, धुगधुगी इत्यादी.

III) प्रस्तुत कादंबरीच्या निवेदनामध्ये शब्द पुनरावृत्ती आढळते. एखाद्या शब्दांचा पुन्हा-पुन्हा अभ्यास करणे हे अभ्यस्त शब्दांचे वैशिष्ट्य येथे अनुभवास येते. असे द्विरुक्त शब्द पुढीलप्रमाणे पाहता येतात.उदा. चळचळ, हुळहूळ, झिरझिर, फूरफूरत, झगझगीत, लसलस, झरझर, हळहळ, कुडकुडत, मिणमिण, ठिकज्या-ठिकज्या इत्यादी प्रस्तुत कादंबरीच्या निवेदनातून शब्दांची अभ्यस्तता द्विरुक्ती प्रत्ययास येते.

**नादानुकारी शब्द**

वातावरण निर्मिती करण्यासाठी आणि त्या वातावरणाचा पात्रांवर ठसा उमटविण्यासाठी कादंबरीकार नादानुकारी शब्दांचा वापर करतात. प्रस्तुत कादंबरीत असे नादमधूर शब्द आले आहेत. त्यांचा उच्चार करताच नादमयतेचा प्रत्यय येतो. उदा. खुळखुळत, झपझप, खडखडवू, कुडकूड, ढणढण.

**ग्रामीण शब्दसामुग्री**

बी.रघुनाथ यांनी प्रारंभीच्या काळात साहित्य क्षितिजावर मराठवाडा प्रदेश साकारताना ग्रामीण बोलीतील शब्द वापरले आहेत.उदा. गारडहन, आकडू, धसमुसळा, चिवट, चाभरा, वरवाडा, सुदरु, मेणा, गोंडेदोरे, गराडा, चाचरत, करडा (आवाज), हुकार, लादणी, कुमट, ओवज्या, छकडा, जलसा, ठोशा, (कडबा) बुचाडं, दमणी, इरकली (साडी), अधू, चळचळ, घोगज्या (आवाज), पिठलं, पुडकं, गिड्ड, मडगे, रानवट, चहाटळ, वाळकुंज्या, आळणी, तबकं, पावसाचमान, बुचक, संजाब, अदमास, थेरडा, तीन निशाण, छन्या, चौधारी, नाट, कठडा, खंगली, उखळला, सिपरा, बांडी, गोग्रास, धडगत, भेदरणे. तसेच ग्रामीण परिसरातील क्रियादर्शक शब्द येथे दिसतात. उदा. रगडणे, धुमसणे, खेकसणे, चरकले, चरफडणे.

**इतर भाषेतील (परभाषीय) शब्दांचा वापर**

मराठवाड्यातील बोलीमध्ये हिंदी-इंग्रजी, ऊर्दू-फार्सी शब्द मिसळले आहेत. त्याचे प्रतिबिंब या निवेदनात पडलेले दिसते. ऊर्दू-फार्सी-हिंदी शब्द खालीलप्रमाणे आहेत. उदा. मोहर, शाई, जबर, नवाब, शादी, देवडी, फैमायसी, जुकाम, तवानी, ठुमरी, कसूर, दहकनी, जवानी, इन्कार, कमाई, इंतेजाम, ताकीर (उशीर), उमेद, आमदानी, फर्मावलं, कफ्फलक, फर्द्या, दर्दी, इसम, जोश, कीर्दी, मुकदमा, मामुली, हकीम, मुन्सफ, जल्लद, हुकूम, खुशामत, शेरवानी, अदब, बडं (प्रस्थ), रुसूम, खुर्दा, तबेत, शरम इत्यादी.

**इंग्रजी शब्द**

फायली, नॉटपेड, पोस्टमन, व्हरांडा, कोच वगैरे काही परभाषीय शब्द जशास तसे वापरले आहेत. अथवा काही शब्द मूळरुपात बदल करुन वापरले आहेत.

**प्रतिमांकित भाषा**

'आडगांवचे चौधरी' या कादंबरीची प्रतिमांकित भाषा ही उच्चभ्रू ग्रामीण जीवनातील बोलीभाषेतून जन्मलेली आहे. शिक्षित कुटुंबातील कारकून व्यक्तीच्या अनुभवातील शब्दसंग्रहाची सरमिसळ या भाषेत आलेली आहे. इंग्रजी व प्रशासनासाठी वापरात असलेली ऊर्दू-फारसी मिश्रित भाषा वतनदार-बुजूर्ग व्यक्ती मिश्र स्वरुपात वापरणे प्रतिष्ठेचे समजत असत. म्हणून या कादंबरीमध्ये येणारी प्रतिमांकित भाषा संस्कृत व अमराठी भाषेतील अलंकार रस योजनेतूनही आलेली दिसते. उदा. "पायाच्या अंगठ्यानं जमीन उकरु लागली." "आडगांवची गुरं मस्तीनं माजून डरकाळ्या फोडीत होती. माणसाचं दास्य सुखावह असल्याचं सूचित करीत होती."२ "जामखेडच्या रस्त्यावर घुंघरमाळाची खिलारी जोडी जुंपलेला छकडा भरधाव धावत येत आहे."३

अशा प्रकारच्या प्रतिमा निवेदनामध्ये आढळतात. त्यामुळे वतनदार माणसांचे त्यांच्या भावभावनांचे व घटना-प्रसंगाचे यथातथ्य दर्शन येथे कुसळासारखं, अर्धमेला उंदीर, फुलपाखरासारखं या उपमासादृश्य प्रतिमा योजलेल्या आहेत. गुरं, फळं, हाडं, खिलारी जोडी, फळ, ... हे प्रतिके प्रतिमांकित भाषेत योजलेली दिसतात. उदा. आकडू, धसमुसळा, थेरडा, घरघुशा, घम्यालं, उजेड, रंडकी, हुरडा, उचल, ...मार, ठेंगण्या, किटाळ, टवळी, वंगाळ, खाकरु, बिरुदे, आसरा, आगाऊ, घुंगरगाळणे, बाधले.

### संवादातून येणारी बोली

I) वहिनी बरी झाली तेव्हा धाडस करुन रांगड्या भाषेत राध्यानं विचारलं, 'वैनी ! आता सवतं (वेगळं) राहीन म्हणतो,' 'का रे बाब ! ...ळलास आम्हाला' आणि 'माझ्या शेतात हुरडा खायला येशील ?' 'असं, सपाट्या कणीस आहे एकेक.'४

II) 'तू बी हायसं का वैनी ? धनीसाहेब एकटंच असतं तर बरं झालं असतं ! बरं जा ! रामराम धनीसाहेब ! वैनीला आता धरुन ठिवलं ...तिला सोडवून न्यायची हका हिंमत ? मला माझ्या आयाभनीची अजून वळख हाय ! बरं चला, भेटू पुन्हा ?'५

वतनदार कुटूंबीयांशी-सामान्य गरीब ग्रामस्थांचा बोलीरुप संवाद ग्रामीण जाणिवांचा अनुभव देतो. सवतं राहीन, हुरडा, सपाट्या कणीस, ...स, ठिवलं, वळख इत्यादी ग्रामशब्द अथवा ग्रामीण वाक्यरचना, स्वाभाविक उच्चार-हेल यांची वेगळिक जाणवते. परिसरनिष्ठ भाषेचे रुप ...नुभवास येते. प्रस्तुत संवादातील बोलीयोजनेतून व्याकरणशुध्द भाषेपेक्षा तोंडी भाषेतील जिवंतपणा भावतो. हुबेहूब प्रसंग घडत असल्याचा ...भास निर्माण होतो. म्हणून घटना-प्रसंगांचा अन्वयार्थ सूचित करणारी भाषा अथवा स्त्री-पुरुषांच्या लकबीचा पुसटसा प्रत्यय प्रस्तुत संवादातून ...ो. प्रस्तुत संवादातून बोलीचे सामाजिकसंदर्भ तथा ऐतिहासिकसंदर्भ सहज लक्षात येतात.

### निष्कर्ष

I) याकादंबरीत इंग्रजी ऊर्दू -फार्सी शब्दांचा वापर या कादंबरीत करण्यात आला आहे. II)निवेदनातील आशयाशी एकरुपता साधणारी ...षा लेखकाने योजली आहे. III)सामाजिक दर्जादर्शक उच्चभ्रू समाजातील प्रतिष्ठित वतनदार तथा सरंजामदार यांची बोलीभाषा या कादंबरीचे ...त्मतत्व अनुभवास येते. IV)या कादंबरीतील भाषेला संस्कृत प्रचूरता लाभली आहे. आणि अलंकार वा रसप्रधानतेचा चढलेला साज आणि ...र्दू भाषेची बाज स्पष्टपणे दिसते. V)प्रस्तुत कादंबरी कथन प्रधान असून कथनाला संपन्न बनविणारी बोलीभाषा या कादंबरीचे केंद्रस्थान आहे. ...तृतीय पुरूषी कथनातून योजलेली बोली परिसरनिष्ठ लकबीचा प्रत्यय येतो. VI)म्हणी-वाक्प्रचार तथा ग्रामीण शब्दसंग्रह परिसरनिष्ठतेची वेगळी ओळख दर्शवितात. VII)ग्रामीण प्रतिमांचा वापर हेच कथनाचे सामर्थ्य आहे. VIII)परभणी परिसरातील भाषिक सवयी तथा या भाषेतील उच्चार ...हेल नजरेत भरण्यासारखे आहेत. IX))आशया-विषयाशी साधर्म्य ठेवून केलेले बोलीचे उपयोजन महत्वाचे वाटते.

### समारोप

मराठवाडा परिवेशातून साकारलेली 'आडगावचे चौधरी' ही पहिली ग्रामीण कादंबरी आहे. बी. रघुनाथांनी या कादंबरीद्वारे मराठी साहित्य ...नकाशावर मराठवाडा प्रदेश साकारला आहे. विशेषता परभणी परिसरातील गाव आणि गावगाडा वर्णन करीत असताना तेथील संस्कृतीबरोबरच ...बोलीचा वापर केलेला आहे. प्रामुख्याने उच्चभ्रू समाजातील प्रतिष्ठित वतनदार-सरंजामदारांची बोलीभाषा योजलेली दिसते. निजामराजवटीत ऊर्दू-इंग्रजी भाषेच्या संक्रमणातून तयार झालेली संमिश्र भाषा या कादंबरीत प्रत्ययास येते. तिच्यात भाषावैभव वाढविणारे परिसरनिष्ठ संदर्भ सापडतात. म्हणी-वाक्यप्रचार, शब्दकळा, ग्रामीण प्रतिमा आणि लकबीच्या माध्यमातून परिसरनिष्ठ शैलीचा आढावा घेणे शक्य झाले.

### संदर्भ


१) भालेराव इंद्रजित, उमरीकर श्रीकांत (संपा). : आडगावचे चौधरी, समग्र बी.रघुनाथ खंड तिसरा, (गणेश वाचनालय, बी.रघुनाथ सभागृह विश्वस्त समिती, परभणी, प्रथमावृत्ती , पृ. ३६३).

२) कित्ता, (पृ.३७२).

३) कित्ता, (पृ.४३२).

४) कित्ता, (पृ. ३५९)

५) कित्ता, : (पृ.४०९-४१०).



ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded